# आकाशवाणी पुणे

# पुणे वृत्तांत

# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 01.10.2023** **वार– रविवार**

---

**स्वच्छता**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त त्यांना कार्यांजली वाहण्यासाठी आज सर्वत्र एक तारीख एक तास एक साथ हे अभियान राबवण्यात आलं. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामती शहरात नागरिक, शालेय विद्यार्थ्यांसमवेत विविध भागांची स्वच्छता करत या अभियानात भाग घेतला. पुणे महानगरपालिकेनं विविध ठिकाणी राबवलेल्या स्वच्छता मोहीमेला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी यावेळी स्वच्छतेची शपथ घेतली. पुणे महापालिकेच्या या महामोहीमेत 65हून अधिक संस्थांच्या तीन लाख 62 हजार नागरिकांनी श्रमदान करून ठीकठिकाणी स्वच्छता केली. या मोहिमेमध्ये एकंदर 61 टन सुका आणि 37 टन ओला असा 98 टन कचरा गोळा करण्यात आला. शहरातील विविध वारसा स्थळे, उद्याने, टेकड्या, नद्यांचे घाट या ठिकाणी ही स्वच्छता मोहीम राबवण्यात आल्याचं महापालिकेचे सहआयुक्त संदीप कदम यांनी सांगितलं.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे एल्प्रो चौक ते चाफेकर चौक स्वच्छता फेरी काढण्यात आली. यात विविध स्वयंसेवी संस्था, संघटना आणि कंपन्यांच्या प्रतिनिधींनी तसंच महाविद्यालयातील विदयार्थी आणि शिक्षकांनी भाग घेतला.

मानवता हिताय सोशल फॉउंडेशनच्या तृतीयपंथी शहराध्यक्षा गायत्री थेरगावकर आणि इतर तृतीयपंथी सदस्यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्वच्छता श्रमदान मोहीमेत सहभाग घेतला.

दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री अर्थात डिक्कीच्या उद्योजकांनीही आज सकाळी पुण्यातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळच्या परिसरात स्वच्छता अभियान राबवलं. तसंच स्वच्छता हीच सेवा अशी सामूहिक शपथ घेतली. पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डच्या वतीने आयोजित स्वच्छता अभियानात डॉ. पी. ए. इनामदार विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. ए. इनामदार, खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी रॅबीन बालेचा, यांच्यासह विविध अधिकारी कर्मचारी सहभागी झाले होते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातही स्वच्छता हीच सेवा उपक्रमाअंतर्गत एक तास श्रमदान करण्यात आलं. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसह विद्यापीठ परिसरात प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांच्या उपस्थितीत हे श्रमदान करण्यात आलं. यात मेजर साकेत पांडे यांच्यासह 100 जवानांनी भाग घेतला.

**संस्कारभारती**

देशांच्या सीमांचं रक्षण करणाऱ्या सैनिकांप्रमाणे कला आणि संस्कृतीचं जतन-संवर्धन करणाऱ्या कलाकारांचं योगदानही महत्त्वाचं आहे असं मत, ज्येष्ठ गायिका डॉ. प्रभा अत्रे यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. संस्कार भारतीच्या अखिल भारतीय कार्यकारिणीच्या उद्घाटन सत्रात त्या बोलत होत्या.

**ईद**

हजरत मोहम्मद पैगंबर जयंतीच्या निमित्ताने आज पुण्यात नाना पेठेतील मन्नुशाह मशिद इथून मिरवणूक काढण्यात येत आहे. राजकीय आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून मिरवणूक मार्गावर मुस्लिम बांधवांचं स्वागत करण्यात येत आहे. मुस्लिम बांधवाकडून खजूर वाटून नागरिकांना शुभेच्छा देण्यात येत आहेत. दुपारी साडेतीन चार वाजता ही मिरवणूक सुरू झाली असून, नेहरू चौकातील शुभान्शहा दर्गा इथं रात्री ही मिरवणूक समाप्त होईल, असं सीरत कमिटीने कळवलं आहे.

**शिष्यवृत्ती**

इयत्ता दहावी आणि बारावीत 80 टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना पुणे महापालिकेतर्फे शिष्यवृत्ती दिल जाते. यासाठीचे ऑनलाइन अर्ज 9 ऑक्टोबरपासून

स्वीकारण्यात येणार आहेत. पुणे महापालिकेच्या हद्दीत राहणाऱ्या इयत्ता 10 वीच्या विद्यार्थ्यांसाठी मौलाना अबुल कलाम आझाद शैक्षणिक अर्थसाह्य योजनेअंतर्गत 15 हजार आणि इयत्ता 12वीच्या विद्यार्थ्यांना लोकशाहीर अण्णा भाऊ साठे शैक्षणिक अर्थसाह्य योजनेतून 25 हजार रुपयांची शिष्यवृत्ती दिली जाते.

**बाजारसमिती**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून शंभर ट्रक फळभाज्यांची आवक झाली. गेले दोन दिवस बाजारपेठा बंद असल्याने आणि त्यातच पितृपंधरवडा सुरू झाल्याने बहुतांश फळभाज्यांचे भाव वाढले आहेत. गेल्या काही दिवसात पडलेल्या पावसाचा फटका पालेभाज्यांना बसला असून जवळपास सर्वच पालेभाज्यांचे भाव वधारले आहेत. फळबाजारात सफरचंद, पपई आणि खरबूज यांना मागणी वाढल्याने त्यांचे भावही वाढले आहेत. लिंबांच्या भावात मात्र घसरण झाली. पितृपक्षामुळे फुल बाजारात फारशी मागणी नसल्याने फुलांचे भाव घसरले आहेत.

**ससून**

पुण्यातील ससून रुग्णालयाच्या प्रवेशद्वाराजवळून 2 कोटी रुपये किमतीचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेनं केलेल्या या कारवाईत 1 किलो 75 ग्रॅमचं मेफिड्रोन जप्त करण्यात आल्याचं हिंदुस्थान समाचार या वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज आकाश ढगाळ होतं. अधून मधून पावसाच्या हलक्या सरी पडल्या. उद्याही असंच हवामान राहून कमाल तापमान 30 अंश सेल्सियसच्या आसपास राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**